# प्रेस नोट

अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव
दि.०२.०६.२०२२

**आलोसे श्री.योगेश जगन्नाथ ढिकले, वय–३२, व्यवसाय–नोकरी, पोलीस उप निरीक्षक, मेहुणबारे पोलीस स्टेशन, रा. जिजाई नगर, तरपुडे रोड, मेहुणबारे ता.चाळीसगांव जि.जळगांव (पोलीस विभाग वर्ग–२) यांना १,००,०००/–रु. लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम स्वीकारंताना लाचलुचपत प्रतिबंध विभाग,जळगांव यांची कारवाई.**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | घटक | :– | जळगांव |
| २ | गुन्हा नोंद कमांक | :– | मेहुणबारे पो.स्टे. गु.र.नं. ०१३२/२०२२ |
| ३ | कलम | :– | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम–७ प्रमाणे... |
| ४ | आरोपीचे नांव व कार्यालय | :– | श्री.योगेश जगन्नाथ ढिकले, वय–३२, व्यवसाय–नोकरी, पोलीस उप निरीक्षक, मेहुणबारे पोलीस स्टेशन, रा.जिजाई नगर, तिरपुडे रोड, मेहुणबारे ता.चाळीसगांव जि.जळगांव (पोलीस विभाग वर्ग–२) |
| ५ | मागणी केलेली लाचेची तारीख व रक्कम | :– | दि.०२/०६/२०२२<br>प्रथम ४,५०,०००/–रु. व तडजोडीअंती १,००,०००/–रु. लाचेची मागणी |
| ६ | स्विकारलेली लाचेची रक्कम | :– | १,००,०००/–रु. |
| ७ | गुन्हा दाखल तारीख | :– | दि.०२/०६/२०२२ |
| ८ | थोडक्यात माहीती | :– | यातील तक्रारदार व इतर ०३ इसम यांचे विरुद्ध मेहुणबारे पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.००७१/२०२२, भादवि कलम ११५, ११८ व १२०ब प्रमाणे दि. २९/०३/२०२२ रोजी गुन्हा दाखल आहे. सदर गुन्ह्यात तक्रारदारास अटक होवुन मा.न्यायालयाकडुन अटि व शर्तीवर जामीन मंजुर झालेला आहे.मा. न्यायालयाने तक्रारदारास दर गुरुवार व शनिवार रोजी मेहुणबारे पोलीस स्टेशन येथे हजेरी दिलेली आहे. तक्रारदार हे दि.२८/०५/२०२२ रोजी मेहुणबारे पोलीस स्टेशन येथे हजेरी देणेसाठी गेले असता योगेश ढिकले यांनी तक्रारदारास तुला गुन्ह्यात शिक्षा होणार नाही, अशा पद्धतीने कागदपत्र तयार करुन मदत करेल, तसेच गुन्ह्याचे चार्ज शिट कोर्टात लवकर दाखल करुन तुझी दर गुरुवार व शनिवारची पोलीस स्टेशनची हजेरी बंद करुन देईल असे सांगुन योगेश ढिकले यांनी तक्रारदार यांचेकडे ४,५०,०००/–रुपये लाच मागणी केलेबाबत तक्रारदार यांनी दि.०२/०६/२०२२ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव कार्यालयाकडे तक्रार दिली होती.<br>सदर तक्रारीची अॅन्टी करप्शन ब्युरो, जळगांव पथकाने पंच साक्षीदारा समक्ष दि.०२.०६.२०२२ रोजी पडताळणी केली असता यातील<br>आलोसे यांनी तक्रारदार यांना शिक्षा होणार नाही असे कागदपत्र तयार करुन मदत करणेसाठी तसेच गुन्ह्याचे चार्जशीट कोर्टात लवकर दाखल करणेसाठी व दर गुरुवार व शनिवारची पोलीस स्टेशनची हजेरी बंद करण्याच्या मोबदल्यात तक्रारदार यांचेकडे पंचासमक्ष प्रथम ४,५०,०००/–रुपये व तडजोडीअंती १,००,०००/–रुपये लाचेची मागणी केली व सदर लाचेची रक्कम आलोसे यांनी वर नमुद वेळी व ठिकाणी पंचासमक्ष स्विकारली म्हणुन गुन्हा. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकांबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जळगांव कार्यालयात संपर्क करावा.

**संपर्क पत्ता:**– अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय,जळगांव जिल्हाधिकारी कार्यालय परिसर,अल्पबचत भवन बिल्डींग,जळगांव.

**ईमेल आयडी:**– dyspacbjalgaon@gmail.com

**संकेतस्थळ:**– acbmaharastra.gov.in

**टोल फ्री कमांक:**– 1064

**दुरध्वनी कमांक:**– 0257-2235477

**व्हॉटस्अॅप कमांक:**– 8766412529

पोलीस उप अधिक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव

02.06.2022

**शशिकांत श्रीराम पाटील**
पोलीस उप अधिक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव